नि.फौ.ख. ३९१/२०२५

नि.क्र. १४ /क

<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १</u>

<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,</u>

..........................................................................................................

नांव – श्री. डी.डी. लंके

वय – ३८ वर्षे,

नेमणूक – सहा.पो.नि. गेवराई पोलीस ठाणे.

..........................................................................................................

<u>सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती एस.ए. गायकवाड यांचेमार्फत सुरु</u> –

१. दि.०६.११.२०२४ रोजी मी सहा.पोलीस निरीक्षक पदी गेवराई पोलीस ठाण्यात कार्यरत होतो. दि.०५.११.२०२४ रोजी रात्री २३.०० पासून ०६.११.२०२४ रोजी सकाळी ५.०० वा. पर्यत माझी रात्रगस्त होती. आम्ही महामार्गावर गस्त घालत असताना मा. पोलीस अधिक्षक बीड यांच्या विशेष पथकातील सहा.पो.नि. श्री बाळराजे दराडे यांचेकडून बातमी मिळाली की, अवैध वाळू वाहतुकीची त्यांना माहिती मिळालेली आहे. सबब कार्यवाहीकरीता आम्हाला मदतीसाठी बोलवण्यात आले. आम्ही रात्रीच मदत करण्यासाठी पाडळसिंगीच्या ब्रीज खाली पोहोचलो असता तेथे श्री एपीआय दराडे व त्यांच्या पथकातील पो.ह. जायभाये, पोना सानप व इतर पो.ह. मुंडे हे हजर होते.

२. त्या ठिकाणी दोन हायवा आले. आम्ही त्यांना थांबवले. त्यापैकी एका हायवाचा क्र.एमएच२३/बीके/८८२२ असा होता व दुस–या हायवाचा क्र.एमएच१२/एन.एक्स/८२२२ असा होता. त्यापैकी एक हायवा शेख साबेद शहाबुददीने व दुसरा हायवा शेख महेफुज शेख अख्तर हे चालवत होते. त्या हायवामध्ये वाळू असल्याने आम्ही वाळूच्या रॅायल्टी संदर्भात विचारले. दोन्ही हायवामध्ये साधारण ५–५ ब्रास वाळू होती. चालकाने आम्हाला रॅायल्टी सकाळी देतो असे सांगितले. रॅायल्टी भरली नसल्याने सपोनि दराडे यांनी दोन्ही हायवांचा पंचनामा केला व त्यांना पोलीस स्टेशनला आणले. त्याच दिवशी रात्री उशिरापर्यत दोन्ही चालकांनी रॅायल्टीचे कागदपत्र दिले नाहीत. सबब रात्री उशिरा त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला. मला

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.06 12:53:24 +0530

दाखवण्यात आलेला फिर्यादी जबाब तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा आणि बरोबर आहे. फिर्यादी जबाबाला **नि.१५** देण्यात येते. दोन्ही आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकतो. आज ते हजर नाहीत.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपी तर्फे उलट तपास वकील श्री के.एस. वैद्य यांचेमार्फत सुरु.</u>**

३. त्या दिवशी गस्त घालतेवेळी माझे सोबत गाडी चालक कोण होते हे मला निश्चीत सांगता येणार नाही. सपोनि दराडे यांचा फोन आला त्यावेळी आम्ही गढीच्या ब्रीजवर होतो. हे म्हणणे खरे आहे की, पाडळसिंगी ब्रीजखालील रस्ता हा दोन राष्ट्रीय महामार्गा संबंधीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, हे दोन्ही महामार्ग कायम रहदारीचे असतात. हे म्हणणे खरे आहे की, ब्रीजच्या खाली बीड कडे जाणा–या रस्त्यावर तसेच मादळमोही कडे जाणा–या रस्त्यावर लहान मोठे हॉटेल टप–या आहेत.

४. दोन्हीही हायवा ताब्यात घेण्याची कारवाई सपोनि दराडे यांनी केली. त्या संदर्भात पंचनामा झाला होता. पंचनाम्यावेळी कोण पंच होते हे मला आता सांगता येणार नाही. दि.०६.११.२०२४ रोजी रात्री १०.०० वा. सुमारास या घटने संदर्भात फिर्याद दिली होती. दोन्ही आरोपींना रॉयल्टीची माहिती देणेबाबत लेखी नोटीस देण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी घटनेच्या दिवशी अवैध वाळूच्या हायवावर कारवाई केलेलीच नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, अशी कारवाईच केली नसल्याने सरकारमार्फत खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.06 12:53:30 +0530

**गेवराई.** **(श्रुती ह. पाटील)**

**दि. ०६/०४/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गेवराई**

**कोर्ट क्र.२**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 06.04.2026 |
| Transcribed on | :- | 06.04.2026 |
| Checked & Signed on | :- | 06.04.2026 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer, Georai.